# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 27/06/2020 (शनिवार)
(सकाळ)

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 03 कि.मी. मौजा पालोरा शिवार येथे दिनांक 20/06/2020 चे 23:00 वा. ते दिनांक 21/06/2020 चे 01:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– इरफान हबीब खान, वय 29 वर्ष, रा. पालोरा हे त्यांच्या पालोरा शिवारातील शेतीमध्ये रोटावेटर मारण्याकरिता त्यांच्या एमएच–40/डीयु– 6786 क्रमांकाच्या मोटरसायकलने गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 40,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय शिंदे 9822932253 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – दिनांक 25/06/2020 चे 08.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांची 9 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ सोनवणे हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 7 कि. मी. मौजा बामणी पुर्णवसन येथे दिनांक 26/02/2020 चे 03:10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रत्नाबाबू वासुनागेश्वर दंडा, वय 49 वर्ष, रा. तिमीडेथा पडू पो. स्वर्णा जि. प्रकाशम आंध्रप्रदेश व त्याचा मित्र हे त्यांच्या किरायाच्या रूम मध्ये बामणी पूर्णवसन येथे हजर असता आरोपी नामे– 1) जयप्रकाश श्रीराम ताथीनेने, वय 45 वर्ष, रा. खंडारा पिपरी त.मौदा, 2) सुरेश सुब्बाराव दंडा, वय 52 वर्ष, रा.फेगड पुर्णवसन कुही व इतर 2 हे त्यांच्या पांढऱ्या रंगाचे फोरव्हीलर गाडी क्र. एमएच–31/जे–5975 ने तेथे आले. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी व त्याचा मित्र याचा घरामध्ये घुसले फिर्यादीचा मित्र नामे– विरनारायन हनुमंतराव धुलीपाला याला ‘तु आमच्या शेती पिकाचे पैसे का दिले नाही’ असे म्हणून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देवून त्यास लाकडी दांडयाच्या लोखंडी फावडयाने डोक्याच्या डाव्या बाजूला व डाव्या पायावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 452, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ यादवराव कुंभरे 7448123937 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर